PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 1

# साठोत्तरी मराठी गीतरचनांचा आकृतिबंध

**प्रा. आरती वि. पांडे**
अंशकालीन अधिव्याख्याता
श्रीमती रेवा बेन पटेल महिला महाविद्यालय,
भंडारा. **[महाराष्ट्र] भारत**

'गीत' हा एक रंजनाचा प्रकार आहे. काव्य व संगीत हयांनी गीत समृद्ध होते. या रंजनात नावीन्याला महत्व असते. विशिष्ट काळातील गरजा व भावबंध यावर रचलेली गीते प्रभावी ठरतात. अशी गीते समाजमान्य होतात. गीत हा कलात्मक साहित्याचा प्रकार असून रंजन हे त्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे रंजनाला आवश्यक असलेली रचना पद्धती गीतात दिसून येते. मन सुखावणाऱ्या स्वररचनेची तिला जोड दिली जाते.

प्रतिमासृष्टी, छंद, वृत्त, यमक, अनुप्रासादी अलंकार आणि शब्द यांची विशिष्ट प्रकारे जाणीवपूर्वक रितीने, कौशल्यपूर्ण व रंजक पद्धतीने, गेयता उत्पन्न करेल अशा ढंगाने रचना व योजना केल्यास 'गीत' निर्माण होते. गीत ही एक रचना असते आणि ती गेयच असते. लघुता हे गीताचे एक वैशिष्टय म्हणता येईल. गीतात श्रुतिसुभग आणि अर्थवाही शब्दयोजना महत्वाची असते. गीत सुबोध असावे लागते. दुर्बोध असून चालत नाही. गीत हे ऐकण्यासाठी असल्याने त्याचा परिणाम तात्काळ अपेक्षित असतो.

**मंगेश पाडगांवकर :–**

पांडगांवकर हे कवी म्हणून जेवढे श्रेष्ठ आहेत तेवढेच गीतकार म्हणूनही श्रेष्ठ आहेत. मराठी भावगीतांना लिहून आज जवळपास 92 वर्ष पूर्ण झाली पण भावगीतांची गोडी तूसभरही कमी झाली नाही. अनेक भावगीत आजही सतत ऐकाविशी वाटतात त्याचे कारण गाण्यातील गेयता हेच आहे.

मराठी भावगीत क्षेत्रात अनेक कवी गीतकारांनी आपल्या भावगीतांनी मराठी भावगीतांच दालन समृद्ध केलं त्यात उच्च स्थानावर ज्या काही कवींची नावे घेता येतील त्यात 'मंगेश पाडगांवकर' हे नाव वरच्या स्थानावरच आहे.

'गाण्यात सर्व माझ्या माझे ईमान आहे

ज्याचे खरे न गाणे तो बेईमान आहे.'

असं म्हणतं आपल्या काव्यतत्वांशी आणि काव्यमूल्यांशी कुठलीही प्रतारणा न करता भावगीतांपासून बोलगाण्यांपर्यंत आणि गझलपासून वात्रटिकेपर्यंत गाण्याचे विविध फॉर्म त्यांनी लिलया हाताळले.

1950 साली 'धारानृत्य' या आपल्या पहिल्या काव्यसंग्रहामुळे कवी पाडगांवकर रसिकांसमोर आले. त्यानंतर 1953 साली 'जिप्सी' हया कवितासंग्रहाने तर त्यांना रसिकमान्यता आणि भरपूर प्रसिद्धीही मिळाली आणि नंतर त्यांची अनेक कवितासंग्रह प्रकाशित झाली आणि गाजलीही.

'निसर्ग' ही काव्याची पहिली प्रेरणा मानणारे पाडगांवकर कोकणातल्या वेंगुर्ल्याचे हे सर्वश्रृतच आहे. त्यामुळे त्यांच्या गीतातून निसर्गाची विविध रूपे दिसतात तशाच प्रेमाच्या विविध छटाही दिसतातच. त्यांच्या काव्यातील 'नाद' हा शब्दांपेक्षाही स्वतः पाडगांवकरांना महत्वाचा वाटतो. गीतातील आशय हा गीतातील धृपदामध्ये सारांशरूपाने ते सांगत. कवितेची किंवा गीताची सुरवात ही नेहमी धृपदाने सुरू होते व नंतर इतर कडवी किंवा गाण्याचा अंतरा असतो. धृपदातील आशयाचा विस्तार व स्पष्टीकरण हे त्यांच्या कडव्यांमध्ये असते. स्वतः पाडगांवकरांना त्यांच्या गीतरचनेविषयी विचारले असता ते म्हणतात, ''गीताचा एखादा तुकडा सुचतो व पुढे गीत तयार होते, ही त्या तुकडयाचीच प्रेरणा.''

पाडगांवकरांच्या गीतातून निसर्गाची आणि प्रेमाची विविध रूपं दिसतात ती बालकवी आणि बोरकरांच्या काव्यातील निसर्ग आणि त्यांनी स्वतः अनुभवलेला कोकणातील निसर्ग पाडगांवकरांच्या अनेक गीतरचनांमधून दिसून येतो.

उदा.

''जेव्हा तुझ्या बटांना उधळी मुजोर वारा

माझा न राहतो मी हरवून हा किनारा''

किंवा

''लाजून हासणे अन् हासून ते पाहणे

मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे''

''तीन्ही लोक आनंदाने .....''

अशा कितीतरी भावगीतांमधून निसर्गासोबतच प्रेम, प्रेमाच्या छटा व्यक्त होतांना दिसतात. सोबतच हृदयसंवाद नाद–लयीच्या माध्यमातून हळुवारपणे उलगडतांनाही दिसतो. तसेच त्यांच्या अनेक गीतांमध्ये

स्वरलालित्या सोबतच अक्षरांच्या द्विरूक्तीने आणि एकेरी प्रत्ययामुळे जवळीकताही चटकन लक्षात येते. उदा. (दे रे) 'तुझे गीत गाण्यासाठी सुर लाऊ दे रे' पाडगांवकरांची अनेक भावगीतं श्रीनिवास खळे, यशवंत देवां यासारख्या महान संगीतकारांनी संगीतबद्ध केले व अरूण दाते, शोभा जोशी, लता मंगेशकर यासारख्या गुणी गायकांनी गायीलेली आहेत. त्यांच्या गीतांची एखादं दुसरी वैशिष्टय नसून अनेक कलात्मक आणि गुणात्मक वैशिष्टये आणि काव्यात्मक वैशिष्टये यांनी परिपूर्ण अशी गीतरचना पाडगांवकरांनी केलेली आहेत.

- पांडगावकरांच्या गीतातील कल्पनाविलास आणि काव्यात्मकता 'श्रावणात घननीळा बरसला' या गीतातून सहजपणे उलगडला आहे. 'निसर्गाशी हृदयसंवाद' हे त्यांच्या गीताचे वैशिष्टय सांगता येईल. त्यांच्या गीतातील समर्पक शब्दयोजना ही काव्याची आणि गुणांची उंची आणि गोडी वाढवणारी आहे.
- पाडगांवकरांचा सप्तसूरांचा अभ्यासही दांडगा असावा असे अनेकदा वाटते. कारण त्यांच्या अनेक गीतांमधील स्वरलालित्याचे कौशलय त्यांनी मोहकतेने मांडले आहे.
- अकृत्रिमता हे ही त्यांच्या गीताचे वैशिष्टय आहे. सहज, सोपी, सुबोध रचना व प्रासदिकता प्रेमगीतांमध्ये अनेकदा आढळते.
- निसर्ग आणि प्रेमाचं चित्र ते स्वर–शब्दांमधून ताकदीने उभे करतात. 'शुक्रतारा मंदवारा' हे पांडगांवकराचं अजरामर द्वंद्व गीत याचं उत्तम उदाहरण म्हणून सांगता येईल.
- मानवी भाव–भावनांचा कल्लोळ त्यांनी अनेकदा आपल्या गीतांमधून व्यक्त केला. तसेच जीवनाचे तत्वज्ञान सोप्या शब्दात सांगून ते गीत गुणगुणल्यामुळे वारंवार लक्षात राहिल असा स्वर–संगीत साजही त्या गीतांना मिळाला व ती गीते दीर्घकाळ स्मरणात राहिली ('अशी पाखरे येती') (या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे)
- काही गीतांमध्ये तर त्यांनी दिखाऊ, नाटकी अस्तिकाची कान उघाडणी आपल्या शब्दातूनच केली. (उदा. कुठे शोधीसी रामेश्वर अन् कुठे शोधिसी काशी) अर्थगहनता या वैशिष्टयांमुळे त्यांची अनेक गीते हृदयाचा व मनाचा ठाव घेतात. पाडगांवकरांची शब्दरचना गायनाकुल आहे.
- ''गीताची रचना छंदोबद्ध हवी, धृपद असलेली हवी, त्यात काव्यगुण असायला हवेत आणि ते गायिले गेले पाहिजे'' असे स्वतःच पाडगांवकरांचे म्हणणे आहे. या कसोटीवर पाडगांवकरांची गीते अभ्यासली असता त्यांची गीते (कविता सुद्धा) 'गीत' या निकषावर/मापदंडावर यथायोग्य व महत्वपूर्ण ठरतात.

**सुरेश भटांची गीतरचना :–**

साठोत्तरी मराठी गीतरचनेत सुरेश भटांचे नाव खुप मानाने घेतले जाते. 1961 साली सुरेश भटांचा 'रूपगंधा' पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला आणि त्या कविता संग्रहातील पहिल्याच कवितेत खुद्द आशा भोसले यांचा सुस्वर लाभला आणि हया कवितेचे गीत होऊन ते घराघरात पोहचले हे गीत म्हणजे

'मलमली तारूण्य माझे तू पहाटे पांघरावे !

मोकळया केसात माझ्या तू जिवाला गुंतवावे.''

'जे गायिले जाते ते गीत' अशी सोपी व्याख्या सुरेश भट स्वतःच करतात. त्यादृष्टीने त्यांच्या गीतरचनेचा अभ्यास आणि आनंद घेता येईल.

सुरेश भट म्हणजे अजब, अनाकलीत अशा वृत्तीचे होते. कलंदर स्वभावाचे होते. ते स्वतःच आपल्या एका कवितेत म्हणतात की,

''फाटक्या पदरात माझ्या का तुझे मावेल अंबर

दान ही करशील तू पण, मी असा आहे कलंदर''

अशा या कलंदर वृत्तीच्या माणसाने हळुवार, मलमली गीते लिहिली, तशीच सामाजिक प्रेरणेतून आणि सभोवतालच्या ताण—तणावातून आणि समाजाभिमुख प्रवृत्तींना आव्हान देणारी गीते ही लिहिली.

सुरेश भटांना संगीताची उत्तम जाण होती. त्यामुळे त्यांच्या गीतरचना हया गायनाकुल आहेत. स्वराज्य आणि गीतांच्या ऱ्हस्व, दीर्घाचे वजन लक्षात घेऊन ते गीतरचना करतांना दिसतात. 'गेयता' हा सुरेश भटांच्या गीतांचा गुणधर्म म्हणता येईल.

पु.ल. देशपांडे भटांच्या गीताविषयी म्हणतात, ''भटांच्या कवितेत सुगंधासारखे गाणे दडलेले होते, हे गाणे अंगभूत होते कुणीतरी गायिल्यामुळे त्या कवितेचे गाणे झाले नव्हते.''

''एकटा माझ्यासवे मी बोलतो

एकटा माझा मला मी ऐकतो.''

हा त्यांचा आत्मसंवाद आहे. सुरेश भटांच्या गीतांना सूरांची लय मिळाल्याने त्यांची कविता गातच येते. या दृष्टीने त्यांची 'मोहरवाशीण' कविता (गीत) महत्वाची आहे. (मेंदिच्या पानावर) 'ग' या एका शब्दाने यमक साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. सुरेश भटांच्या गीतात सहज, सोपे शब्द जागोजागी आढळतात. 'रंग माझा वेगळा' या काव्यसंग्रहातील गीते या दृष्टीने अभ्यासता येतील.

''गीतात जर भावाशय नसेल तर, ती केवळ सोपी रचना असेल त्यामुळे ते गीत निकृष्ठ होईल.'' असे स्वतः सुरेश भटांना वाटते. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक गीताचा भावाशय अकृत्रिम शब्दरचनेत गुंफलेला असतो.

उदा.

''मनातल्या मनात मी तुझ्या समीप राहतो

तुला न सांगता तुझा वसंत रोज पाहतो.''

भटांच्या गीतांची जडणघडण गायनाकुल, अकृत्रिम शब्दरचना, महत्वाचा भावाशय, अनलंकृत आहे तशीच धूर्त, दांभिक, खोटेपणा याची त्यांना आत्यंतिक चीड असल्याने समाजवास्तवतेचे सत्य, स्पष्टपणे मांडणारी आहे.

उदा.

आपापल्या सुखाशी केला करार त्यांनी

किंवा

गर्दीत गादद्यांच्या सामिल रामशास्त्री

सुरेश भटांच्या अनेक गीतांमधून वैयक्तिक संदर्भ ‘स्व’ पातळीवरचा आहे असे जाणवते. आणि काही गीतांमधून ‘मी’ ची असलेली जाणीव कथात्म मनोगतातून उमटते.

उदा. ‘मनातल्या मनात मी तुझ्या समीप राहतो.’

‘आज मी जे गीत गातो’

‘सूर मागू तुला मी कसा’

गानसम्राज्ञी लता मंगेशकर त्यांच्या गीतांविषयी म्हणतात, ‘‘भटांची गीते वाचतांना मला ती त्यातल्या काव्यकल्पनांमुळे जशी आकर्षून घेतात, तसे त्यात दडलेले ‘गाणे’ ही मला सारखे जाणवत राहते.’’

सुरेश भटांनी प्रेम, श्रृंगार, समाज, देशप्रेम, ईश्वर, श्रृंगार, भाषा, आत्मनिष्ठा इत्यादी अनेक विषयांवर गीतरचना केली. त्यांच्या गीतात निसर्गानुभूती, प्रणयानुभूती, स्त्रीकेंद्री अनुभूती, सामाजिक अध्यात्मानुभूती यांचा प्रत्यय येतो.

सुरेश भटांची गीते ही त्यांची स्वतःची आहेत. कुठल्याही संप्रदाय किंवा कवी–गीतकारांचा ठसा त्यांच्या गीतांवर उमटलेला दिसत नाही. सुरेश भटांची गीतरचना तरल, सुरेल आणि प्रतिभा संपन्न युक्त आहे. त्यांना जे भावले, आवडले, जाणवले ते त्यांनी संपूर्ण अनुभवानिशी स्वतंत्र वाण्याने शब्दबद्ध केले.

सुरेश भट हे नाव उच्चारताच जशा त्यांच्या गझलरचना मनामध्ये रूंजी घालू लागतात तशाच त्यांच्या गीतांना लता मंगेशकर, आशा भोसले, सुमन कल्याणपूर या श्रेष्ठ गायिकांचा स्वर मिळाला व हृदयनाथांनानी त्यांच्या गीतांना उत्कृष्ट संगीतात बांधल्यामुळे सुरेशभट रसिकांना केवळ गझलकार म्हणूनच नव्हे तर उत्कृष्ट गीतकार म्हणून माहिती झाले आणि रसिकांच्या हृदयात आपल्या गीत–गझलांनी वेगळे स्थान निर्माण करून गेले.

**ना. धो. महानोरांची गीतरचना :–**

ना.धो. महानोर यांचे 1967 ते 1998 या काळात जवळपास एकूण आठ कविता–गीत प्रकाशित झाले आहेत. महानोरांनी जी गीते लिहिली, काही चित्रपटासाठी आणि नाटकासाठीही पन्नासच्या जवळपास गीते लिहिली त्याला त्यांनी स्वतः 'गीतरचना' म्हटले आहे. त्यांच्या 'पावसाळी कविता' काव्यसंग्रहात 'जैत रे जैत' या चित्रपटासाठी लिहिलेली गाणी आहेत. तसेच 'गाथा शिवरायाची' व 'अजिंठा' गीतमालीकारूप निवेदनात्मक पद्धतीचे आहेत. निवेदन व गीतात एकरूपत्व आढळून येते. गीतरचनेची कवीची मूळ प्रकृती असल्याने त्यांच्या गीतरचनांना लोकगीतांचा अस्सल बाज वापरल्याचे अनेक ठिकाणी दिसते. 'पळसखेडची गाणी', 'तिची कहाणी' या संग्रहातील कविता–गीतांचा विचार लोकगीतांच्या अंगाने केल्याचे लक्षात येते.

आपल्या मनातल्या हृदयसंवाद ते निसर्गाशी साधत असलेले दिसतात. त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहाचे नावच 'रानातल्या कविता' आहे आणि 'रानातली रान गाणी' यात अधिक आहेत. मूळात महानोर हे प्रतिभासंपन्न कवी. त्यांच्या अंगात लय मूळातच भिनलेली असल्याने त्यांची गीते गायानुकूल झालेली आहेत. लोकगीतांचे वैभव त्यांच्या गीतांना समृद्ध करतात हे ही महत्वाचेच आहे.

महानोरांच्या गीतांचा विचार करतांना पारंपारिक लोकगीतं, जात्यावरील ओव्या, आरत्या, आई–आजीच्या आणि शेजारणींच्या मुखातून उत्स्फूर्तपणे बाहेर पडलेल्या ओव्या, गाणी, सण–उत्सवांची गाणी या सर्वांच्या महानोरांवर झालेला संस्कार त्यांच्या गीतांमधून काव्य–गीत लेखन करतांना झालेला दिसतो.

महानोरांच्या गीतांमध्ये विविधता आहे. निसर्ग, स्त्रीकेंद्री अनुभूती, सामाजिकता, अध्यात्मानुभूती, कृषी केंद्री आशय प्रणयासक्ती (प्रणयानुभूती) याची विविध रूपे आढळतात. 'रानातल्या कविता', 'वही', 'पानझड' या संग्रहात निसर्गानुभवाशी एकरूप केंद्रित अशा कविता गीतांची संख्या 30 च्या वर आहे. त्यांच्या अनेक कविता हया गीत–ढगांच्या आहेत. महानोरांची कविता–गीते निसर्गाच्या साथी संगतीने वाढली आहेत. कारण कवी जातीवंत निसर्गकवी आहे. लोकगीतलय प्रधानता हे त्यांच्या निसर्गगीतांचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे. त्यांचे कविता–गीतातील निसर्ग सजीव झालेला आहे.

उदा. (जांभुळ पिकल्या झाडाखाली)

(मी रात टाकली, मी कात टाकली)

(आम्ही ठाकरं ठाकरं, हया रानाची पाखरं)

'जैत रे जैत' चित्रपटातील गाण्यांमुळे महानोरांच्या गीतांना लोकप्रियता मिळाली. रसिकांची भरभरून दाद मिळाली. त्यांच्या प्रेम कविता हया निसर्ग आणि प्रेम यांचे अतूट नातं सांगणाऱ्याच आहेत.

महानोरांनी सामाजिक आशयाच्याही कविता लिहिल्या तशाच ऐतिहासिक गीतरचनाही केल्या, कथात्म गीतरचना हे वेगळेपण त्यांनी आपल्या गीतांमधून व्यक्त केले. शिवरायांच्या कथेला सुंदर, समर्पक

काव्यगीतांची जोड देऊन त्यांनी एक नवीन प्रयोग केला आणि तो बऱ्याच अंशी यशस्वीही झाला. कथा आणि संगीत या दृष्टीने आपण त्यांच्या गीतरचनांकडे बघायला हवे.

महानोरांनी काही 'लावण्यां'चीही रचना केली. 'वही' आणि 'पानझड' संग्रहात त्यांच्या काही लावण्यांचा समावेश केलेला आहे. काही कविता लावणी ढगांच्याही आहेत. लावणीत असलेला श्रृंगार, काळजाचा ठाव घेणारे शब्द, गिर्रेबाज यमक, निसर्गाशी नातं या साऱ्यांनी नटलेल्या लावण्या रसिकांच्या विशेष पसंतीत उतरल्या आहेत. (उदा. भरल आभाळ पावसाळी पाहुणा गं)

(किती जीवाला राखायाच राखलं

राया तुम्ही जाळयात पाखरू टाकल)

(राजसा जवळी जरा बसा)

महानोरांची 'वही' लावणीला पुरेपूर न्याय देणारी ठरली आहे. शाहिरांनी रचलेल्या लोकप्रिय लावण्यानंतर बऱ्याच काळांनी महानोरांनी इतक्या सुंदर लावण्या रचल्या ही रसिकांसाठी आनंदाची बाब आहे.

एक यशस्वी कवी, गीतकार, चित्रपटगीतकार म्हणून रसिकांची विशेष पसंती मिळाल्याने महानोरांच्या काव्य–गीतांचा अभ्यास अधिक सूक्ष्मपणे करावा लागतो.

आपल्या गीतरचनेकरिता लोकगीतांचा आणि बोलीभाषेचा सुंदर वापर, भाषा, शब्द, लय, छंद व गेयता यामुळे लोकसाहित्याशी त्यांच्या गीतांचा असलेला अनुबंध अधिक उठावदारपणे झालेला आहे. तसेच गेयता आणि सोबतच लयबद्धता हे गीतांचे खास वैशिष्टय. रंगाकर्षण, निसर्ग घटकांचा वापर, निसर्गप्रधानता, श्रृंगार प्रधानता यामुळे गीतरचना अधिक लक्षवेधी झालेली आहे.

गीतरचनेतील विविधता, नवनवे काव्यातील प्रयोग करून कविता–गीत या सीमारेषेवर झुलणाऱ्या आणि आदर्श व सुंदर उत्तम काव्यांसाठी गीतांसाठी कुठलीही तडजोड न करता महानोरांनी गीतरचना केल्या व चित्रपटातही मागणी तसा पुरवठा हा न्याय न वापरता कथेला योग्य न्याय देणारी गीतं त्यांनी लिहिली. म्हणूनच आजही त्यांची गीतं अनेक कार्यक्रमात गायक गातांना दिसतात व रसिकांची दाद मिळवतात.

**शांता शेळके यांची गीतरचना :–**

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कोणकोणत्या स्त्री कवयित्रींनी गीतरचना केली असा जर प्रश्न विचारला तर त्याचे चटकन उत्तर देतांना शांताबाई शेळके हेच नाव आधी आठवेल. कारण मराठी

भावगीतांमध्ये आणि चित्रपट गीतांमध्ये सर्वात जास्त गीतरचना करणाऱ्या शांताबाई हया स्त्री गीतकार आहेत हयावर कुणाच दुमत नसावं.

1947 साली प्रकाशित झालेल्या 'वर्षा' या त्यांच्या काव्यसंग्रहाने त्या रसिकांच्या कवयित्री म्हणून परिचित झाल्या, आणि 1973 साली प्रकाशित झालेल्या 'तोच चंद्रमा' हया पहिल्या गीत संग्रहाने त्या सुप्रसिद्ध गीतकार 'शांता शेळके' म्हणून रसिकमान्य पावल्या. या गीतसंग्रहात जवळपास 108 गीते आहेत आणि ती सर्व लोकप्रिय झालेली उदा. 1) तोच चंद्रमा नभात, 2) रेशमाच्या रेघांनी, 3) गजानना श्री गणराया, 4) गणराज रंगी नाचतो, 5) शालू हिरवा पाचूनी मरवा, 6) मनाच्या धुंदीत, 7) पपा सांगा कुणाचे, 8) जाईन विचारीत ..... खुप गीतं सांगता येतील.

'वर्षा', 'रूपसी' मध्येही त्यांच्यात दडलेल्या गीतकाराचे रूप दाखवता येईल. 1956 साली रूपसी प्रसिद्ध झाला. कुठेतरी त्यांना आपल्यातल्या गीतकाराला अभिव्यक्तीची संधी मिळाली. सुरवातीच्या काळात तांबे आणि रविकिरण मंडळातील कवींच्या कविता—गीतांचा ठसा त्यांच्याही काव्यावर होता पण नंतर मात्र त्यांची रचना गीतांना योग्य न्याय देणारी आणि विविधांगी झालेली दिसते. पुढे आकाशवाणी आणि ध्वनिमुद्रितच्या माध्यमातून त्यांची गीते रसिकांपुढे आली.

नाटक आणि चित्रपटाकरीता गीतलेखनाविषयी शांताबाईंना विचारणा होऊ लागली. चित्रपटांत गीतलेखनाचा त्यांना अनुभव नव्हता पण कै. वसंत पवारांनी त्यांना या कामात सहकार्य केल्याचे शांताबाई नम्रपणे सांगतात. नाटकातील पदे लिहिण्यासाठी पं. जितेंद्र अभिषेकींची मदत झाल्याचे त्या सांगतात. मंगेशकर कुटूंबियांचा त्यांच्याशी असलेला स्नेह सर्वश्रुत आहेच. पण मंगेशकर कुटूंबियांची त्यांना चित्रपटातील गीतं लिहिण्यासाठी खुप प्रेरणा मिळाली आणि मदत झाली प्रोत्साहन मिळालं. असं त्या आवर्जून सांगतात.

शांताबाईंनी जशा कविता लिहिल्या तशाच गीतप्रकारात भावगीतं, भक्तीगीतं, नाटयगीतं, कोळीगीतं, बालगीतं, द्वंद्वगीतं, लावणी अशा विविध प्रकारांनी युक्त गीतरचना करून एक समृद्ध गीतकार म्हणून रसिकांच्या त्या आवडत्या झाल्या. 'तोच चंद्रमा' (1973) या संग्रहातील गीतरचनेची त्यांची विविधता अभ्यासण्यासारखी आहे.

सुधीर फडके यांनी गायिलेले 'तोच चंद्रमा नभात' हे गीत आजही ताजे टवटवीत वाटते. कारण शब्दाची कुठेही ओढताण न होऊ देता गीतातील गुणांना नेमका न्याय देणारी शब्दरचना व सहजता हया शब्दरचनेच्या वैशिष्टयांमुळे (उदा. तोच चंद्रमा नभात, तीच चैत्र यामिनी...) श्रृतीसंवेदनेकडून चित्रमयी दृक संवदेनकडे या गीताचा प्रवास सुरू होतो. गीता रस, रंग, गंध, स्पर्श, संवेदनेचा वारंवार प्रत्यय येतो. कारण सुधीर फडके यांनी योजिलेले स्वरलालीत्य व सूरसंवाद. शांताबाईंच्या गीतरचना हया साध्या सोप्या असल्या तरी त्यातील शब्दरचना भावस्पर्शी आहे. गीतातील भावाशय समर्थपणे प्रगट करण्याचे शब्द सामर्थ्य त्यांच्या रचनेत आहे.

शांताबाईंच्या गीतात प्रेम आणि विरहाची जाणीव तर प्रगट होते पण सामाजिक जाणिवेचा धागाही गीतातून व्यक्त झालेला दिसतो. उदा. (पहा टाकले पुसुनी डोळे)

कोळीगीतांची रचना करतांना त्यांनी त्या भाषेचा आणि शब्दाचा अभ्यास केला. 'डोलकर' हा शब्द त्यांनी र.वा. दिघे यांच्या एका पुस्तकातून घेतला. भाषा समजून घेऊन रचना केली. उदा. (सारंगा माझ्या सारंगा राजा) सारंगा म्हणजे कोळी. हा शब्द त्यांनी योजिला.

शांताबाईंच्या 'तोच चंद्रमा' या गीतसंग्रहानंतर त्यांचा 1986 साली 'कळयांचे दिवस फुलांच्या रानी' हा दुसरा गीतसंग्रह प्रकाशित झाला.

'स्वान्तसुखाय' प्रकारातील त्यांनी अनेक गीतं लिहिली तर काही चित्रपटाच्या कथेच्या मागणीनुसारही लिहिली. काही गीतं हिंदी, बंगाली, गुजराती गीतांच्या चाली त्यांना आवडल्याने ती शैली घेऊन त्या चालींवर स्वतंत्र रचना केली. तर काही गीतं स्वतःच्या काव्यकथेतून जन्माला आली. गीताची गरज लक्षात घेऊन कलात्मक रचना केली. लोकगीतांचा बाजही काही गीतांसाठी वापरला. या संग्रहात काही भावगीतं तर काही चित्रपटगीतांचा समावेश करण्यात आलेला आहे. चांगलं गीत तयार होण्यासाठी मुळात ती कविता चांगली असावी लागते तरच तीचे गीतं तयार होत. आणि ती काव्यमूल्य घेऊन प्रगटलेली स्वतंत्र निर्मिती ठरते.

शांताबाईंचा 'चित्रगीते' हा तिसरा गीतसंग्रह 1995 ला प्रकाशित झाला. या संग्रहात 151 गीते आहेत. या संग्रहात संपूर्ण गीतांचा समावेश केलेला आहे. मंगेशकर घराण्याचे आश्वासक प्रोत्साहन, मोलाची मदत, जिव्हाळयाचे घरगुती संबंध यातून लता मंगेशकरांनी त्यांना त्यांच्या काही चित्रपटाताची गाणी लिहायला सांगितली. त्यात 'राम राम पाव्हतं' 'आनंदघन' या नावाने लताबाईंनी संगीत दिलेली गाणी शांताबाईंनीच केली. त्यात (शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुनाची भीती) हे अतिशय गाजलेलं गीत. 'चित्रगीतेच्या' प्रस्तावनेत त्यांनी आपल्या गीतलेखनाच्या यशाचे श्रेय संगीत दिग्दर्शक आणि गायकांनाही दिले आहे. हा त्यांचा नम्र, हळवा मनमिळावू स्वभाव आणि मनाचा दिलदारपणाच म्हणावा लागेल.

शांताबाईंना इतकी सुंदर गाणी कशी सुचत असावी असा प्रश्न अनेकदा रसिक श्रोत्यांना पडायचा. तर त्यांनी बालपणी जे खुप चांगलं ऐकलं, श्रवण केलं आणि मनात साठवून ठेवलं त्यामुळे इतकी वैविध्यपूर्ण गीत रचना त्या करू शकल्या असाव्यात. कारण शांताबाईच बालपण खेडेगावातच गेलं. आपल्या आजोळी त्या जास्त राहिल्या. घरी वाचनाची आवडं असल्याने अनेक पुस्तकं त्यांच्याही घरी वाचनाची आवडं असल्याने अनेक पुस्तकं त्यांच्याही वाचनात आली त्यातूनच देवादिकांच्या आरत्या, स्तोत्रे, भूपाळया, ओव्या, जात्यावरची गाणी, सण–उत्सवांप्रसंगी म्हणावयाची गाणी या सर्वांचा सुरेल संस्कार त्यांच्या काना–मनावर झाला व पुढे चित्रपट गीतं लिहितांना त्याचा त्यांना चांगला उपयोग झाला.

पुढे चित्रपटात गाणी लिहितांना संगीत दिग्दर्शकांकडून शिकायला मिळाले आणि मंगेशकर भावंडांकडूनही त्या खुप चांगलं शिकल्या.

काव्य आणि गीत या दोन्ही क्षेत्रात त्यांनी विपुल लेखन केलं. दोन्हीच्या प्रेरणा वेगळया असल्या तरी त्यात एकरूपता जाणवते. कवितेत स्वअनुभूतीला महत्व तर गीतामध्ये इतरांच्या मनाचा विचार करून कारागिरीला महत्व. गीतामध्ये 'गेयता' महत्वाची, लय–तालं, यमक, धृपद–अंतरा हया सर्वांचा अभ्यास

महत्वाचा आणि गीतकाराला हया सर्वांचा विचार करूनच गीताची बांधणी करावी लागते. सहज सोपे शब्द, नाटयपूर्णरचना, चित्रमयता या गोष्टी उत्तम गीतासाठी आवश्यक. हे सर्व शांताबाईंनी परीश्रमपूर्वक आणि अभ्यासपूर्णरितीने केल्याने त्यांच्या रचना उत्कृष्ट भावगीतं आणि चित्रपट गीत ठरली.

'गणपतीची गाणी' हा गीतसंग्रह 1999 मध्ये प्रकाशित झाला आणि खुप लोकप्रिय झाला. 'गणपतीला वाहिलेल्या हया गीताचे स्वरूप एकवीस दूर्वाच जणू' असं त्या म्हणतात. 'गजानना श्री गणराया', 'दाता तू गणपती गजानन', 'धाव धाव रे श्री गजवंदना', 'गणराज रंगी नाचतो', 'देव गजानन माझा' या सर्व गीतांनी मराठी रसिकांना भक्तीरसाचा अनुभव स्वर शब्दातून देण्याचा प्रयत्न शांताबाईंनी केला आणि तो खराच ठरला. गणेशाच्या रूप गुणांच वर्णन महर्षी नारदांनी, संत ज्ञानदेवांनी, समर्थ रामदासांनी, आपल्या वंदनेतून वेळोवेळी केले तसेच शांताबाईंनी आपल्या परीने श्री गणरायाच्या रूपगुणांचा वर्णन केले आहे.

'रेशीमरेघा' आणि 'श्रावणशिरवा' या (2002) संग्रहातील गीतरचना आजही रसिकांच्या ओठी आहेत. अनेक युवा गायक अनेक संगीत स्पर्धांमध्ये शांताबाईंची गाणी गाऊन बक्षिसे मिळवितात. 'असेन मी नसेन मी' हा गीतसंग्रह 2003 मध्ये प्रकाशित झाला आणि प्रेम–निसर्गानुभूती आणि आध्यात्मिक अनुभूती असा त्यांचा गीतप्रवास झालेला दिसतो.

'असेन मी नसेन मी, तरी असेल गीत हे

फुलाफुलात येथल्या, उद्या हसेल गीत हे'

त्यांच्या गीतांची गोडी कधीही कमी होणारी नाही. ही गीते लिहून कित्येक वर्ष लोटली तरी त्यातून निरंतर स्वरानंदाचीच प्राप्ती होते. कारण अविस्मरणीय अशीच ही गीते आहेत. शांताबाईंच्या गीतांमधून अलवार प्रेमभावना, वात्सल्य भावना, विरहार्तता, प्रियकराच्या भेटीची अनावर ओढ, प्रेमाकरीता समाजबंधन झुगारणारी प्रेयसी, स्वप्नाळू वृत्ती, स्वसंवाद रिती, सौंदर्यासक्त मनोवृत्ती, अशी कितीतरी स्त्री सुलभ मनोवृत्तीचे पदर त्यांनी आपल्या गीतांमधून उलगडली व ती गीते लोकप्रिय झाली.

**समारोप :–**

'साठोत्तरी मराठी गीतरचनेचा आकृतिबंध' ज्या चार कवी–गीतकारांच्या संदर्भात मांडला त्यात पाडगांवकर, सुरेश भट, शांता शेळके, ना.धो. महानोर हे चारही कवी–कवी म्हणून तर श्रेष्ठ आहेतच पण गीतकार म्हणूनही त्यांना खुप लोकप्रियता मिळाली. 1960 नंतर या चारही गीतकारांनी विपुल गीतलेखन केले त्यामुळे 'गीत' या प्रकाराचे क्षेत्र विस्तारत गेले. भावगीतं असो की चित्रपट गीतं रसिकांची आवड आणि आस्वादनक्षमता लक्षात घेऊन गीताची व्याप्तीही वाढत गेली. गीतातील विविधता आणि अनेकपदरी रूपं रसिकांसमोर आली. प्रेम, विरह, निसर्ग, भक्ती, श्रृंगार, सामाजिकता, स्वप्नरंजन, गूढता, आध्यात्मिकता, राष्ट्रप्रेम, स्त्री केंद्रीवृत्ती असे विविध विषय स्वानुभूती किंवा आत्मानुभूती तसेच वस्तुनिष्ठ पद्धतीने गीतांमधून येऊ लागली. सामाजिक आणि राष्ट्रीय भावनांचा परिपोष गीतांमधून दिसून आला.

प्रसार माध्यमांचा रसिकांवर वाढलेला परिणाम गीतकारांना फायदयाचाच ठरला. आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट, नाटय, अशा अनेक माध्यमांमध्ये हे गीतकार लोकगीतांच्या बाजाचा आणि बोलीभाषेचा वापर करून प्रसंगी प्रासंगिक गीतरचना करू लागले.

शब्द, सूर, लय, ताल, नाद, भाव (धृपदातील) धृपद आणि अंतऱ्यात भावाभिव्यक्ती करू लागले व गीत परिणामकारक होऊ लागले.

साठोत्तरी मराठी गीतरचनेचा आकृतिबंध बराच मोठा आणि विस्तृत आहे. तसेच अभ्यासण्याजोगाही आहे. पण या चारही कवींनी आपल्या गीतरचनांमुळे रसिक मनाला खुप आनंद दिला, त्यांनी श्रवणतृष्णा आपल्या गीताने तृप्त केली. कुठलेही गीत रसिकमान्य आणि लोकप्रिय होण्याकरीता त्या गीतांमधील काव्य उत्तम आणि दर्जेदार असावं लागतं. नंतर ते गीत गुणी संगितकाराच्या हाती पडून त्या गीताला उत्तम चाल (स्वरबांधणी) लाभावी लागते व ते गीत सुरेल गायकांच्या स्वरातून आविष्कृत होऊन रसिकमनाला थेट भिडल्यास त्या गीताचं सोनं झाल असं म्हणता येतं.

वरील चारही गीतकारांच्या गीतांना हे भाग्य लाभलं आणि त्या गीतांचं सोनं झालं असच म्हणावं लागेल आणि रसिकही भाग्यवानच म्हणावे लागतील की त्यांना उत्तम आणि दर्जेदार गीतं ऐकायला मिळाली आणि आजही ही गीतं ऐकत राहाविशी वाटतात.

## संदर्भग्रंथ सूची

1. अंधारयात्रा – त्र्यं. वि. सरदेशमुख, मौज, मुंबई 1960.
2. अर्वाचीन मराठी काव्य – केशवसुत आणि नंतर, रा.श्री. जोग नवभारत, मुंबई 1946.
3. अर्वाचीन मराठी काव्यदर्शन – अक्षयकुमार काळे, पा.ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर 1999.
4. आधुनिक मराठी कवयित्रींची कविता – रा.ग. जाधव, प्रतिमा, पुणे 1996.
5. आधुनिक मराठी कविता – भ.श्री. पंडित, सुविचार प्रकाशन नागपूर, आ.दु. 1968.
6. आधुनिक मराठी कविता : काही रूपे काही रंग – गो.म. कुळकर्णी, मेहता प्रकाशन, पुणे 1991.
7. आधुनिक मराठी काव्य : उद्‌गम, विकास आणि भवितव्य – दि.के. बेडेकर, नागपूर विद्यापीठ नागपूर, 1969.
8. आधुनिक मराठी काव्याचे अंत:प्रवाह – वा.भा. पाठक, ठोकळ प्रकाशन, पुणे 1964.
9. कविता आणि रसिकता – रा.ग. जाधव, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, 1995.
10. कविता फुलते अशी – वा.रा. ढवळे आणि व.दि. कुळकर्णी, ओरिएण्ट लॉगमन, दिल्ली, 1975.

11. कविता – संकल्पना, निर्मिती आणि समिक्षा – वसंत पाटणकर, मुंबई विद्यापीठाचा मराठी विभाग आणि अनुभव, मुंबई 1995.
12. कवितारती – विजया राजाध्यक्ष, श्री विद्या प्रकाशन, पुणे 1979.
13. कवितेची रसतीर्थे – निषिकांत मिरजकर, संजय प्रकाशन, पुणे, 1982.
14. कवितेविशयी – वसंत आबाजी डहाके, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, 1999.
15. काव्य आणि काव्य शास्त्र – व.दि. कुळकर्णी, पद्मगंधा 2001.
16. काही मराठी कवी – जाणिवा आणि शैली – सुधीर रसाळ, शारदा प्रकाशन, नांदेड 1984.
17. गीतकाव्य – वसंत दावतर, आलोचना प्रकाशन, मुंबई 1971.
18. गीतभान – रमेष तेंडुलकर, विश्वमोहिनी प्रकाशन, पुणे 1982.
19. दुसरी परंपरा – दा.भि. कुळकर्णी, प्रभा प्रकाशन, नागपूर 1974.
20. पहिली परंपरा – द.भि. कुळकर्णी, अमेय प्रकाशन, नागपूर 1976.
21. पुन्हा एकदा कविता – ना.धों. महानोर व चंद्रकांत पाटीत, नीळकंठ प्रकाशन, पुणे 1982.
22. मराठी कविता जुनी आणि नवी – वा.ल. कुळकर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई 1980.
23. मराठी कविता – नवी वळणे – प्रकाश देशपांडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 1994.
24. मराठी कविता : स्वरूप आणि विवेचन – निशिकांत ठकार, स्वाध्याय महाविद्यालय, पुणे 1977.
25. साठोत्तरी मराठी कविता व कवी – रा.ग. जाधव, 1997.
26. स्वातंत्र्योत्तर मराठी कविता – डॉ. सुशमा करोगल, प्रतिमा प्रकाशन, पुणे 1999.
27. साहित्य : अध्यापन आणि प्रकार (कविता : तेंडुलकर) – श्री.पु. भागवत, सुधीर रसाळ, मंगेष पाडगांवकर, शिल्पा तेंडुलकर, अंजली किर्तने, पॉप्युलर व मौज प्रकाशन, मुंबई 1987.
28. कविता आणि प्रतिमा – सुधीर रसाळ, मौज प्रकाशन, मुंबई 1982.